ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधान: ” इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २८ | पुणें, बुधवार तारीख १८ जुलै, १९६२ | अंक १४

## विविध माहिती

**बंगलोर शहराचा पाणीपुरवठा**—बंगलोर शहराच्या पाणीपुरवठ्यांत सुधारणा करण्याच्या कामीं भारताच्या संरक्षण खात्यानें कांहीं आर्थिक मदत देण्याचें मान्य केलें आहे बंगलोर येथें असणाऱ्या लष्करी महत्त्वाच्या कारखान्यांचा विस्तार करण्याच्या योजना आंखण्यांत आल्या आहेत. परंतु कारखान्यांना लागणारा पाणीपुरवठा अपुरा असल्यानें संरक्षणखात्यालाहि कांहीं हालचाल करणें जरूर वाटूं लागलें आहे.

**सुताची सहकारी गिरणी**—मध्यवर्ती सरकारचे आंतरराष्ट्रीय व्यापारखात्याचे मंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं मध्यप्रदेशांत सुताच्या सहकारी गिरणीची पायाभरणी केली. ह्या गिरणीच्या स्थापनेसाठी ८६ लाख रुपये भांडवल लागेल. अशा प्रकारची ही पहिलीच गिरणी असून, ती बहुधा १९६३ च्या अखेरीस सुताचें उत्पादन करूं लागेल.

**प्रवाशांच्या संख्येंत घट**—भारत सरकारच्या अर्थखात्यानें परदेशीय चलनांत बचत करण्याच्या दृष्टीनें परदेशगमनावर कडक निर्बंध घातले आहेत. त्यामुळें परदेशीं जाणाऱ्या हिंदी प्रवाशांच्या संख्येंत बरीच घट झाल्याचें आढळून आलें. रविवार ता. ३० जून रोजीं ७०० बोइंग जेट विमानानें अवघे ६० प्रवासी सांताक्रूझ विमानतळावरून परदेशीं गेले. ह्या मोठ्या विमानांत १३० प्रवासी बसण्याची सोय आहे.

**सचिवालयांतील कामचुकार नोकर**—केरळच्या सरकारनें केलेल्या अधिकृत अंदाजाप्रमाणें त्रिवंद्रम् येथील सचिवालयांत काम करणाऱ्या नोकरांपैकी ३० टक्के नोकरवर्ग आपल्या जागीं आढळून येत नाहीं. कामाच्या वेळांत हे नोकर चहापान अगर धूम्रपान करीत गप्पागोष्टी करण्यांत गढलेले असतात. सचिवालयाभोंवतीं असणाऱ्या झाडाखालीं त्यांच्या बैठका चालू असतात.

**राजकीय पीडितांवरील खर्च**—गेल्या १२ वर्षांच्या कालांत पश्चिम बंगाल सरकारनें राज्यांतील वृद्ध राजकीय पीडितांना आर्थिक साह्य देण्यासाठी ६२ लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम खर्च केली. आर्थिक मदत ही निवृत्तिवेतन अगर देणगी ह्या स्वरूपाची करण्यांत आली. सुमारें २,००० राजकीय पीडितांना मदतीचा लाभ झाला. अलीकडे आणखी २० पीडितांना २०० ते ५०० रुपयांपर्यंत देणग्या देण्यांत आल्या.

**आदिवासींच्या हितासाठी कायदा**—मध्यप्रदेश सरकारनें राज्यांतील आदिवासींच्या हितासाठी एक कायदा केला असून तो राष्ट्रपतींची संमति मिळतांच अमलांत आणण्यांत येईल. बहुतेक आदिवासी सावकारांच्या तावडींत सापडलेले आहेत. त्यांना कर्जमुक्त करण्यासाठी खास अधिकार असलेले न्यायाधिकारी नेमण्यांत येणार आहेत.

**विमानांच्या पुरवठ्याचें कारण**—अमेरिकेनें पाकिस्तानला ध्वनिपेक्षाहि अधिक वेगानें जाणारीं कांहीं लढाऊ विमानें दिल्यामुळें भारताला रशिआकडून ‘ मिग ’ विमानें घेण्याचा विचार करणें भाग पडलें. कांहीं रशिअन विमानांनीं पाकिस्तानच्या उत्तरेकडील भागावर ६०,००० फुटांवरून भ्रमण केल्यामुळें पाकिस्ताननें अमेरिकेकडे ध्वनिलहरींपेक्षा अधिक वेगानें जाणाऱ्या विमानांची मागणी केली म्हणून अमेरिकेनें ती पुरवली, असें वृत्त आहे.

**बहिऱ्यांना आशेचा किरण**—ध्वनिलहरींना संस्कारक्षम असणारीं कानांतील हाडें टणक झाल्यानें बहिरे झालेल्यांना आशेचा नवा किरण दिसूं लागेल, असें दिसतें. टणक झालेल्या हाडांच्या जागीं प्लॅस्टिकचीं नवीं हाडें बसविण्याची शस्त्रक्रिया लंडनमधील एका शस्त्रवैद्यानें केली असून, ती बऱ्याच प्रमाणांत यशस्वी झाल्याचें वृत्त आहे.

**ब्रिटनला जाणाऱ्यांची गर्दी**—गेल्या एप्रिलमध्यें ब्रिटनच्या सरकारनें कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतून ब्रिटनला येणाऱ्या नागरिकांसंबंधीं नवीन कायदा केला. त्यामुळें ब्रिटनला जाणाऱ्यांची गर्दी वाढली होती. गेल्या तीन महिन्यांत भारतांतून ५,००० हिंदी नागरिक ब्रिटनमध्यें स्थायिक होण्याच्या दृष्टीनें तिकडे गेले.

**वैमानिकांचा संप**—अमेरिकेंतील दोन मोठ्या विमानवहातूक कंपन्यांच्या १,००० वैमानिकांनीं प्रे. केनेडी ह्यांच्या विनंतीस मान न देतां संपाचा आश्रय केला. संपाचा परिणाम पॅन अमेरिकन वर्ल्ड एअरवेज ह्या कंपनीवर विशेष झाला. ही कंपनी दरसाल ४० लाख प्रवासी परदेशांत नेते–आणते. हौशी प्रवाशांचा हंगाम चालू असतांनाच संप करण्यांत आला.

**५,००० मानसशास्त्रज्ञांची आवश्यकता**— मध्यवर्ती सरकारचे उप-आरोग्यमंत्री डॉ. राजू ह्यांनीं हैदराबाद येथील एका इस्पितळांतील मानसिक रोग्यांवर उपचार करणाऱ्या विभागाचे उद्घाटन केलें. ह्या प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं, भारतांत मनोविकृतीनें पछाडलेले १० लाख रोगी आहेत, व त्यांच्यावर उपचार करण्यासाठी ५,००० मानसशास्त्रज्ञांची आवश्यकता आहे.

**हैदराबाद शहराचा पाणीपुरवठा**—हैदराबाद शहराच्या पाणीपुरवठ्यांत वाढ करण्यासाठी शहरापासून ४८ मैलांवर मंजिरा नदीवर एक धरण बांधण्यांत येणार आहे. धरण दोन टप्प्यांत बांधण्यांत येणार असून त्यासाठी ३·७५ कोटी रुपये खर्च येणार आहे. दोन्ही टप्पे पुरे झाल्यावर शहराला रोज ४·२ कोटी गॅलन पाणी मिळेल.

**छोट्या शेतकऱ्याला सवलत**—आंध्र सरकारनें शेतसारा वाढविण्यासंबंधीं एक बिल विधानसभेंत आणलें असून सध्यां तें चिकित्सा समितीकडे सोंपविण्यांत आलें आहे. ह्या बिलांतील कांहीं तरतुदींना कॉंग्रेसच्या व विरोधी पक्षाच्या आमदारांनीं विरोध दर्शविला होता. विरोधी टीकेचा विचार करून राज्य सरकारनें छोट्या शेतकऱ्यांवर बसविण्यांत आलेल्या जादा शेतसाऱ्याच्या दरांत कपात केली आहे.

**हिंदी तज्ज्ञांची निवड**— आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेनें आफ्रिकेमधील सात देशांतील हस्तव्यवसायांची पाहाणी करून घेण्यासाठी एका हिंदी तज्ज्ञाची निवड केली आहे. हा तज्ज्ञ केनिआ, युगांडा, टँगानिका, नायजेरिआ, सूडान, इत्यादि देशांमधील हस्तव्यवसायांची पाहाणी करील. आफ्रिकेमधील ग्रामीण भागांतील बेकारी कमी करण्याच्या उद्देशानें पाहाणी करण्यांत येणार आहे.

**प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना जेवण**—तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत प्राथमिक शाळेंतील विद्यार्थ्यांना मधल्या वेळचें जेवण फुकट देण्याच्या कार्यक्रमांत बहुतेक राज्य सरकारें सामील होतील. सध्यां ४० लाख गरजू व अर्धपोटी विद्यार्थ्यांना मधल्या वेळचें खाणें पुरविण्यांत येतें. सर्व मुलांना असें खाणें पुरवावयाचें झाल्यास ३०० कोटी रुपये खर्च येईल.

**लाकूड टिकाऊ बनविण्याचा कारखाना**— रेल्वेसाठी लागणारे लाकडी स्लीपर्स टिकाऊ बनविण्याचा कारखाना काढण्याचें रेल्वेबोर्डानें ठरविलें आहे. कारखाना जम्मू भागांत काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी ६० लाख रुपये भांडवल लागेल. काश्मीरच्या जंगलांतून भारतीय रेल्वेसाठी दरसाल १० लाख स्लीपर्स पुरविण्यांत येतात. त्यांची किंमत १ कोटी रुपये होते. कारखान्यांतून दरसाल ८ लाख संस्कारित स्लीपर्स मिळूं शकतील.

**ग्रीसमधील डॉक्टरांचा संप**—रोग्यांच्या नातेवाइकांकडून देण्यांत येणाऱ्या धमक्यांपासून सरकारी संरक्षण मिळविण्यासाठी ग्रीसमधील १०,००० डॉक्टरांनीं ४ तास संप केला. दोन महिन्यांपूर्वी अथेन्समधील एका डॉक्टरनें एका बाईवर केलेली शस्त्रक्रिया अयशस्वी झाली. बाई मेल्यामुळें तिच्या यजमानानें डॉक्टरला गोळी घालून ठार केले. गुन्हेगाराला २० वर्षें तुरुंगवासाची शिक्षा झाली. पण ही शिक्षा फार कमी आहे, असें डॉक्टरांचें म्हणणें आहे.

**कुटुंबनियोजन स्त्रियांना अधिक पटलें**—मध्यप्रदेशामधील स्त्रियांना कुटुंबनियोजनाचें महत्त्व अधिक पटलेलें दिसतें. १९६० ते १९६१ ह्या कालांत ४,३७५ स्त्रियांनीं स्वतःवर संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करून घेतली. ह्याउलट, ३,७६५ पुरुषांनींच अशी शस्त्रक्रिया करून घेतली अशी माहिती राज्य विधानसभेंत सरकारतर्फे सांगण्यांत आलें.


**ग्रामीण भागांतील रस्ते**—ग्रामीण भागांत रस्ते बांधण्याचें काम करण्यासाठी एक फंड उभारण्याचा विचार भारताचें नियोजन मंडळ करीत आहे. राज्य सरकारांनीं खेडेगांवांना उपयोगी पडणारे रस्ते बांधण्यास उत्तेजन मिळावें म्हणून हा उपक्रम करण्यांत येत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत प्रत्येक राज्याचे रस्ते बांधण्यासाठीं कांहीं रकमेची तरतूद केली आहे. त्यांतील १० टक्के रक्कम फंडास वर्ग करावी अशी सूचना करण्यांत येत आहे.

## बँकांनीं सहकारी शेतीसंस्थांस आर्थिक साह्य देण्यास उत्तेजन

### सरकारी मदतींत वाढ

शेतकऱ्यांना शेतकीउत्पादनवाढीसाठी पुरेसा पैसा कर्जाऊ देण्यास सहकारी संस्थांना उत्तेजन देण्याच्या हेतूनें, सरकारनें सहकारी कर्जपुरवठा समितीच्या शिफारशीनुसार, सेवा सहकारी संस्थांकडून आणि मध्यवर्ती सहकारी बँकांकडून मागील वर्षांपेक्षा जी जादा कर्जाऊ रक्कम शेतकऱ्यांस मिळाली असेल त्यावर त्यांस अनुक्रमें ३ टक्के व १ टक्का आर्थिक अनुदान देण्याचें ठरविलें होतें. मध्यवर्ती सहकारी बँकांनीं सहकारी शेतकी संस्थांना दिलेल्या कर्जाऊ रकमा, या मध्यवर्ती बँकांच्या खास बुडीत कर्ज राखीव निधीस १ टक्का या प्रमाणांत सरकारकडून मिळावयाच्या मदतीच्या रकमेच्या वेळीं हिशोबांत घेण्याचें ठरलें होतें.

परंतु सहकारी शेती संस्थांना पुरेसें कर्ज देण्यास मध्यवर्ती सहकारी बँका कांहींशा नाखूष असल्याचें दिसून आलें. म्हणून या मध्यवर्ती बँकांनीं, सहकारी शेतकी संस्थांना मागील वर्षी दिलेल्या कर्जापेक्षा जें जादा कर्ज दिलेलें असेल तें विचारांत घेऊन, त्यांच्या खास बुडीत कर्जनिधीसाठी १ टक्क्यांऐवजीं २ टक्के या प्रमाणांत साह्य देण्याचा निर्णय सरकारनें घेतला आहे. या निर्णयामुळें मध्यवर्ती सहकारी बँका सहकारी शेती संस्थांस पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणांत कर्जें देण्यास पुढें येतील अशी आशा आहे.



# अर्थ

बुधवार, ता. १८ जुलै, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## गरीब देशांचा बोजा श्रीमंत देशांनीं का वहावा ?

भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी लागणारें परदेशीय चलन सहजीं मिळण्याच्या कामीं अडचणी निर्माण झालेल्या आहेत. आर्थिक साह्य देऊं इच्छिणाऱ्या भारताच्या मित्रराष्ट्रांकडून मिळावयाची मदत वेळेवर मिळेल कीं नाहीं ह्याविषयीं शंका उत्पन्न झालेली आहे. मदत मिळण्याची शक्याशक्यता अजमावण्यासाठी मध्यवर्ती सरकारचे अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई ह्यांनीं युरोपीय देशांचा दौराहि केला. ह्या संदर्भात संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आर्थिक व सामाजिक मंडळापुढें बोलतांना अमेरिकेचे प्रतिनिधी मि. ॲड्लाय स्टिव्हन्सन ह्यांनीं व्यक्त केलेले विचार सूचक म्हणावे लागतील. अप्रगत देशांना देण्यांत यावयाच्या मदतीबद्दल ते म्हणाले कीं, आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या देशांना आधुनिकतेच्या पातळीवर आणावयास पाहिजे ह्यांत शंका नाहीं. परंतु असें करण्याचा सर्व देशांना लागू पडणारा उपाय अमेरिकेनें शोधून काढला पाहिजे असा त्याचा अर्थ नाहीं. उलट प्रत्येक मागासलेल्या देशानें आपल्या परिस्थितीचें निदान स्वतःच केलें पाहिजे; आपल्या विकासाचे मार्ग स्वतःच शोधून काढले पाहिजेत; आपआपल्या देशांतील लोकांना विकासाभिमुख बनविले पाहिजे; आणि आपल्या आर्थिक व सामाजिक जीवनांतील दोष घालविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आजच्या जगांत कांहीं देश श्रीमंत आहेत आणि कांहीं गरीब आहेत ही गोष्ट खरी आहे. तरीसुद्धां बचत करून भांडवलाचा संचय वाढविण्याचें काम फक्त श्रीमंत देशांनींच आपल्या शिरावर घ्यावें असें म्हणणें योग्य होणार नाहीं. ह्या पद्धतीनें कोणत्याच देशाचा फायदा होणार नाहीं. श्रीमंत देशांना गरीब देशांना मदत देतां येणें शक्य आहे किंवा नाहीं, हा प्रश्न निराळा.

कोणत्याहि देशांतील लोकांनीं स्वतःच बचत करून भांडवल गुंतविण्यास शिकले पाहिजे. त्याशिवाय कोणत्याहि देशाचा आर्थिक विकास होणार नाहीं. अविकसित देशांनीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आर्थिक विकासाचें कार्य हें प्रत्यक्ष काम करूनच साध्य होणारें आहे. आर्थिक विकासाच्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या देशांनीं एक प्रकारचें विश्वासाचें वातावरण निर्माण केलें पाहिजे. असें विश्वासाचें वातावरण निर्माण करण्यांत आल्यास देशांतील व परदेशांतील भांडवलाला उत्तेजक परिस्थिति आपोआपच प्राप्त होईल. भांडवल गुंतवणुकीच्या बाबतींत इतर देशांतील औद्योगीकरणाचा इतिहास नजरेसमोर ठेवण्यासारखा आहे. आज जे देश उद्योगप्रधान आहेत, त्यांतील बहुतेक देशांना औद्योगीकरणासाठी लागलेलें भांडवल आणि कौशल्य ह्यांची प्राप्ति खाजगी मालकीच्या विभागापासून झालेली आहे. औद्योगीकरण घडवून आणण्यासाठी पुढाकार घेण्याच्या वृत्तीची आवश्यकता असते. ह्या वृत्तीची जोपासना करण्याचें काम खाजगी मालकीचा विभागच चांगल्या प्रकारें करूं शकतो हें लक्षांत ठेवलें पाहिजे. गेल्या कांहीं वर्षांत पश्चिम युरोप औद्योगिक दृष्ट्या खूप प्रगत झालेला आहे. युद्धानंतर नव्यानें उभारल्या गेलेल्या युरोपनें आपलें व्यापारी धोरण उदार ठेवावयास पाहिजे. सध्यां जगाच्या व्यापारांत समतोलपणा राहिलेला नाहीं. तो आणण्याच्या कामीं युरोप साह्य करूं शकेल. बाकीच्या जगांत आर्थिक विकास घडून येत असतांनाच युरोपमध्यें विस्तृत अशी बाजारपेठ निर्माण होत आहे. नव्यानें विकास पावणाऱ्या देशांना युरोपच्या बाजारपेठेचा फायदा उठविता यावा म्हणून उभयतांनीं संयुक्तरीत्या सहकार्याचें व देवाणघेवाण करण्याचें धोरण स्वीकारलें पाहिजे.

## कंपन्यांच्या डायरेक्टरांचीं दुष्कृत्यें

### कायद्यांतील कलमांचा गैरफायदा

कंपनी लॉ ॲड्मिनिस्ट्रेशनच्या संशोधन विभागानें केलेल्या पाहणीवरून कंपन्यांच्या कारभारांतील अनेक अनिष्ट बाबी उघडकीला आल्या आहेत. त्या संबंधित डायरेक्टरांच्या नजरेस आणल्या जातील आणि जेथें शक्य असेल तेथें कायदेशीर योजनाहि पण केली जाईल. ६५ वर्षांवरील डायरेक्टरांची स्पेशल ठरावांचे द्वारां फेरनिवडणूक, ही आतां नित्याची बाब होऊन गेली आहे; कंपनी कायद्यानें ठेवलेल्या सवलतींचा गैरफायदा घेतला जात आहे. कायदेशीर सल्लागारांची डायरेक्टरबोर्डावर नेमणूक, हा दुसरा अनिष्ट प्रकार आहे. ह्या सल्लागारांचें कंपन्यांतील हितसंबंधांच्या गुंतागुंतीमुळें, त्यांना त्रयस्थांच्या भूमिकेवरून सल्ला देणें अशक्य होऊन बसतें. जें काम केलें नाहीं, त्यासाठीहि कमिशन घेणाऱ्या डायरेक्टरांचीं प्रकरणें उघडकीस आलीं आहेत. कंपनी कायद्याप्रमाणें बोर्डावर जास्तींत जास्त २० डायरेक्टर घेतां येतात; बहुतेक सर्व कंपन्या, लहान कंपन्यासुद्धां, असे जास्तींत जास्त डायरेक्टर नेमूं लागल्या आहेत. वास्तविक, शेअरहोल्डरांच्या हिताच्या दृष्टीनें डायरेक्टरांची संख्या मर्यादितच असायला हवी. डायरेक्टरांच्या सभांस गैरहजर असणाऱ्या डायरेक्टरांची संख्या वाढत आहे; ह्याचा अर्थ त्यांना उपस्थितीबद्दल मिळणाऱ्या फीचें आकर्षण वाटत नाहीं; कंपन्यांतून इतर मार्गांनीं पैसे कमावण्याकडे त्यांचें मुख्य लक्ष असतें. कित्येक कंपन्यांतून घरगुती कामाचे गडी आणि कुटुंबांतील पडद्यांतील स्त्रिया डायरेक्टर म्हणून काम करतात ! त्यांना मिळावयाचें वेतन त्यांना नेमणारेच आपल्या खिशांत घालीत असले पाहिजेत, अशी शंका आहे.

## तिसऱ्या वर्गाचीं तिकिटें हिंदी भाषेंत

हिंदमधील रेल्वेच्या सध्यां चालू असलेल्या तिकिटांवरील मजकूर इंग्रजींत छापलेला असतो. चालू वर्षअखेर तिसऱ्या वर्गाच्या तिकिटांवरील मजकूर इंग्रजीऐवजीं हिंदींत छापण्यांत येणार आहे. ज्या भागांत हिंदी ही स्थानिक भाषा नसेल त्या भागांतील तिकिटांवर हिंदीप्रमाणेंच स्थानिक भाषांतूनहि निघण्याचें ठिकाण व मुक्कामाचें ठिकाण छापण्यांत येईल. वरच्या वर्गाच्या तिकिटांवर हिंदी व इंग्रजी भाषेंतून छपाई करण्यांत येईल.

## सोसायटीचे सभासद, कार्यकारी समितीचे सदस्य आणि पदाधिकारी यांनीं घ्यावयाच्या प्रतिज्ञा

नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडिया, नवी दिल्ली, ह्या संस्थेनें सोसायटीचे सभासद, कार्यकारी समितीचे सभासद व संस्थेचे पदाधिकारी यांच्याकरितां आदर्श प्रतिज्ञापत्रें तयार केलीं आहेत, तीं आम्हीं खालीं उद्धृत करीत आहोंत.

सहकारी संस्थेचें कार्य हें सेवावृत्तीनें, निःपक्षपातीपणानें करावयाचें असतें. हें कार्य करतांना अहंभाव, स्वार्थीपणा, इत्यादि गोष्टींना थारा द्यावयाचा नसतो. स्वहितापेक्षा संस्थेच्या हिताला प्राधान्य द्यावयाचें असतें. सहकारी संस्थांच्या नवीन व जुन्या सभासदांनीं, कार्यकारी समितीच्या सदस्यांनीं व पदाधिकाऱ्यांनीं खालील प्रतिज्ञा घेऊन आपल्या कार्यास सुरुवात करावयाची असा उपक्रम आपल्या संस्थेंत सुरू केल्यास त्याचा फायदा झाल्याखेरीज राहणार नाहीं. ह्या प्रतिज्ञा म्हणजे सहकारी 'गीता'च होय.

### सभासद या नात्यानें मी अशी प्रतिज्ञा करतों कीं,

संस्थेचें ध्येय व तिच्या कार्यक्रमाचा मी अभ्यास करीन.

मी सर्वसाधारण सभेला हजर राहून तिच्या कामकाजांत भाग घेईन.

सभेमध्यें मी माझीं मतें आणि अनुभव इतरांना समजावून सांगेन व त्यांचीं मतें आणि अनुभव यांची माहिती करून घेईन.

मी प्रत्येक प्रश्नाचा अभ्यास काळजीपूर्वक करीन आणि नंतर पूर्वग्रहदूषित न होतां अथवा कुणाचीहि भीड न बाळगतां मतदान करीन.

संस्थेच्या अहवालाचा मी अभ्यास करीन.

माझ्या जमिनीची आणि पिकाची जशी जबाबदारी घेत असतों, त्याचप्रमाणें माझ्या सहकारी संस्थेसंबंधींची जबाबदारी मी पार पाडीन.

दुसऱ्याची जमीन न नांगरतां ज्याप्रमाणें मी स्वतःची जमीन नांगरतों त्याचप्रमाणें मी माझ्या सहकारी संस्थेला पाठिंबा देईन;

करारप्रमाणें मी कर्जफेड करीन.

माझ्या शेजाऱ्यांबरोबर मी माझ्या संस्थेबद्दल विचारविनिमय करीन.

### पदाधिकारी ह्या नात्यानें मी प्रतिज्ञा करतों कीं,

१. स्वहितापेक्षा संस्थेच्या हिताला मी प्राधान्य देईन.

२. कार्यकारी समितीच्या सभासदांना मी पूर्ण विश्वासांत घेईन.

३. सर्व सभासदांशीं मी निःपक्षपातीपणानें व्यवहार करीन.

४. मी संस्थेच्या धोरणांचा अभ्यास करीन आणि तीं निष्ठापूर्वक कार्यान्वित करीन.

५. आपल्या सहकाऱ्यांना संस्थेसंबंधीं माहिती देण्याबाबत मी मदत करीन.

६. माझे विचार आणि समजुती यांत सदैव मी सुधारणा करीन. तसेंच सहकारी विकासासंबंधीं ताज्या घडामोडींबाबत मी जागरूक राहीन.

७. सभांच्या कार्यवाहींत आपुलकी व कळकळ निर्माण व्हावी ह्या उद्देशानें सभापति या नात्यानें मी अत्यंत काळजीपूर्वक सभांचें नियोजन करीन.

८. खुल्या चर्चेसाठी मी सभासदांना पूर्ण संधि देईन.

९. सभांमध्यें घेण्यांत आलेले निर्णय कार्यान्वित करण्याकरितां मी प्रयत्नांची शिकस्त करीन.

१०. उपाध्यक्ष ह्या नात्यानें, अध्यक्षांना साहाय्य करण्याकरितां व त्यांच्याकरितां कार्य करण्यासाठी मी नेहमीं तत्पर राहीन.

११. सेक्रेटरी ह्या नात्यानें, संस्थेची कृति व संस्थेची आर्थिक परिस्थिति यांकडे मी लक्ष ठेवीन. तसेंच संस्थेचे संपूर्ण व अचूक हिशेब मी ठेवीन.

१२. योग्य वेळेवर मी सूचनापत्रें पाठवीन.

१३. कर्मचाऱ्यांवर मी न्याय्य व पद्धतशीर अशी देखरेख ठेवीन आणि संस्थेतर्फे तत्पर व कार्यक्षम सेवा मिळण्याबाबत मी खात्री देईन.

१४. कोषाध्यक्ष ह्या नात्यानें संस्थेच्या पैशाबद्दल मी ज्याप्रमाणें स्वतःच्या पैशाची काळजी घेत असतों तशीच काळजी वाहीन.

### कार्यकारी समितीचा सभासद ह्या नात्यानें मी प्रतिज्ञा करतों कीं,

१. स्वहितापेक्षा संस्थेच्या हिताला मी प्राधान्य देईन.

२. पूर्वग्रहदूषित न होतां अथवा कोणतीहि भीड न बाळगतां सभासदांनीं मतदान करावें यासाठी मी त्यांना प्रोत्साहन देईन.

३. समितीच्या सर्व सभांना मी हजर राहीन.

४. संस्थेच्या धोरणानुरूप कार्यक्रम पार पाडावा यासाठीं मी मदत करीन.

५. संस्थेच्या तपासलेल्या हिशेबांचा अभ्यास करून संस्थेच्या व्यवहारावर मी लक्ष ठेवीन.

६. आपल्या सहकाऱ्यांना संस्थेसंबंधीं माहिती देण्याबाबत मी मदत करीन.

७. मी सदैव अध्ययन करीन व सभेच्या कार्यासंबंधीं मी माहिती ठेवीन.

८. सभासदांच्या नेहमीं भेटीगांठी घेऊन त्यांचे विचार मी जाणून घेईन.

९. मी कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देईन आणि त्यांच्यासाठी शिक्षणवर्गादि कार्यक्रमांची व्यवस्था करीन.

१०. चांगले सामुदायिक संबंध निर्माण करण्यासाठी इतर व्यापारी बंधूंशीं संस्थेसंबंधीं मी चर्चा करीन.

---


### पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें शहर.

## नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सन १९६२-६३ सालाच्या हिशोबांची तपासणी करण्याकरितां येत्या वार्षिक साधारण सभेंत दोन हिशेब-तपासनीसांची नेमणूक करावयाची आहे.

सदर जागांसाठी ज्यांस उमेदवार म्हणून उभें राहावयाचें असेल त्यांनीं आपले अर्ज बँकेच्या मुख्य कचेरींत ३१ जुलै, १९६२ रोजीं दुपारीं ४-०० वाजेपर्यंत अगर त्यापूर्वी पोहोंचतील अशा बेतानें पाठवून द्यावेत.

उमेदवारानें अर्जांत आपलें संपूर्ण नांव, पत्ता व शैक्षणिक लायकी नमूद केली पाहिजे.

हिशेबतपासनीसांच्या नेमणुकीबाबतचे बँकेचे नियम बँकेच्या मुख्य कचेरींत कामाच्या वेळांत पाहावयास मिळतील.

पुणें शहर, वा. म. अळतेकर
दि. ७-७-१९६२. कार्यकारी संचालक

## दि सारस्वत को. बँक लि., मुंबई

नेहमींप्रमाणें आवश्यक त्या सर्व तरतुदी करून सारस्वत को. बँकेनें ३० जून, १९६२ अखेर संपलेल्या वर्षी १·३० लक्ष रु. नफा मिळविला आहे. गेल्या वर्षी तो १·१९ लक्ष रु. होता. बँकेचें वसूल भांडवल ९५१ लक्ष रु. असून रिझर्व्ह व इतर फंड वसूल भांडवलापेक्षाहि जास्त, म्हणजे १०·८९ लक्ष रुपयांचे आहेत. ठेवींची रक्कम २ कोटी, ९७ लक्ष रु. झाली आहे; गेल्या वर्षी ती २ कोटी, ५३ लक्ष रु. होती. म्हणजे, ठेवींत ४४·२६ लक्ष रु. ची भर पडली आहे. बँकेनें ९८·६२ लक्ष रु. चीं कर्जे दिलेलीं आहेत; ठेवींशीं कर्जाचें प्रमाण ३३% पडतें. तर त्या जिंदगीचें ( २ कोटी, ११ लक्ष रु ) ठेवींशीं प्रमाण ७१% पडतें. करमाफ ६३/४% डिव्हिडंड सुचविण्यांत येणार आहे. बँकेकडील एकूण ठेवींपैकी १ कोटी, ४७ लक्ष रु. ह्या सेव्हिंग्ज बँकेच्या ठेवी आहेत; त्या ठेवीदारांना मिळालेल्या व्याजाच्या रकमेवर २५% बोनस देऊनच निव्वळ नफ्याचा हिशेब करण्यांत आला आहे. १ जुलै, १९६२ पासून सेव्हिंग्ज बँक ठेवींवर ३% व्याज देण्यांत येणार आहे. बँकेच्या १९६१–६२ मधील कामाचे हे आंकडे, संचालकांनीं काळजीपूर्वक, दक्षतेनें पण व्यवहारकुशलतेनें केलेल्या कार्याचे निदर्शक आहेत. भागदार, ठेवीदार आणि कर्जदार ह्या सर्वांच्या वाजवीं हिताचा मेळ घालणें हें ह्या बँकेचें वैशिष्ट्य आहे; हे सर्व घटक परस्परविरोधी नसून पोषकच आहेत, हें बँकेच्या धोरणाचें सूत्र आहे.

## दारिद्र्याची भीति घालविण्याचा उपाय

मध्यवर्ती सरकारचे बिनखाती मंत्री श्री. टी. टी. कृष्णम्माचारी ह्यांनीं इंडिअन कौन्सिल ऑफ वर्ल्डअफेअर्स ह्या संस्थेपुढें बोलतांना आर्थिक विकासासंबंधीं आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यांच्या भाषणाचा विषय आर्थिक विकास व सामाजिक न्याय असा होता. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं भारतामधील लोक आतां राजकीय दृष्ट्या समानतेच्या भूमिकेवर आले आहेत. पण सध्यांच्या समाजरचनेंत आर्थिक विषमता पराकोटीला पोंचली आहे. ती तशीच चालू ठेवून समाजाचा गाडा चालू शकेल काय, असा फार महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. समाजाच्या निरनिराळ्या थरांतील आर्थिक विषमता फक्त कराच्या साधनानें नष्ट होणें अशक्यच आहे. त्याच्याहि पलीकडे जाऊन कांहीं उपाय योजणें आवश्यक आहे. पण असे उपाय कोणते हा प्रश्न अद्याप सुटलेला नाहीं. गेल्या पंधरा वर्षांत भारतानें स्पृहणीय आर्थिक प्रगति केलेली आहे. त्यामुळें जवळ जवळ सर्व वर्गांच्या लोकांचा फायदा झालेला आहे. ज्या लोकांचीं उत्पन्नें स्थिर आहेत अशा लोकांचा मात्र अपवाद आहे. पदार्थांच्या किंमती वाढल्यामुळें स्थिर उत्पन्न असलेल्या लोकांवर वाईट परिणाम झाला आहे.

## तेलाच्या विहिरी खोदण्यासाठीं यंत्रसामग्री

भूमिगत तेल व वायू ह्यांच्या विहिरी खोदण्यासाठीं उपयोगी पडेल अशी यंत्रसामग्री रशिआकडून भारताला मिळणार आहे. रशिआच्या उरल पर्वताच्या विभागांत असणाऱ्या कारखान्यांतून ही यंत्रसामग्री बनविण्यांत येत आहे. खोदकाम वेगानें करतां यावें अशा तऱ्हेची ही यंत्रसामग्री आहे. ती तयार झाल्यावर भारताला पाठविण्यांत येईल. तिचा विशेष म्हणजे बहुतेक सर्व यांत्रिक क्रिया स्वयंचलित करण्यांत आल्या आहेत. यंत्रसामग्रीची वाहतूक करणें फारसें अवघड काम नाहीं.

## निर्यात व्यापार वाढविण्याचा प्रयत्न

भारताचा निर्यात व्यापार वाढविण्यासाठीं मध्यवर्ती सरकार कांहीं उपाय योजणार असल्याची वार्ता आहे. देशांत खपणाऱ्या चहावर कांहीं नियंत्रणें घालण्याचा विचार चालू आहे. सरकारला असें आढळून आलें आहे कीं, भारतामधील चहाचा खप दरसाल १० टक्क्यांनीं वाढत आहे; आणि चहाचें उत्पादन मात्र अवघ्या ३ टक्क्यांनींच वाढत आहे. १९६२–६३ सालीं चहाच्या निर्यातीचें लक्ष्य ५०·८ कोटी पौंड ठरविण्यांत आलेलें आहे. हें लक्ष्य गांठण्यांत २·५ कोटी पौंडांची तूट पडेल अशी भीति व्यक्त करण्यांत येत आहे. म्हणून चहाचें उत्पादन वाढविण्याचा व खप कमी करण्याचा विचार करण्यांत येत आहे. देशांतील अंतर्गत खप कमी केल्याशिवाय निर्यातीचें लक्ष्य गांठणें अशक्य होईल, ह्याची जाणीव स्पष्ट झालेली आहे. कापडधंदा सल्लागारसमितीनें कापडाची सक्तीची निर्यात करण्याच्या योजनेस मान्यता दिलेली आहे. ह्या उपायाशिवाय कापडाची निर्यात वाढवितां येणें शक्य होणार नाहीं, ह्याविषयीं एकमत झालेलें आहे. १९६० सालीं ७२·४ कोटी वार कापडाची निर्यात करण्यांत आली होती; परंतु १९६१ सालीं कापडाची निर्यात खूप घसरली आणि अवघ्या ६०·२ कोटी वार कापडाची निर्यात करण्यांत आली. कापडाच्या निर्यात व्यापारांत इतकी कमी निर्यात आजपर्यंत कधींच झालेली नाहीं. गिरण्यांच्या कापडाच्या एकूण उत्पादनापैकीं १२·५ टक्के उत्पादन सक्तीनें निर्यात करण्यांत यावें असा निर्णय घेण्यांत येण्याचा संभव आहे. त्याशिवाय तागासारख्या मालाची निर्यात वाढविण्यासहि उपाय योजण्यांत येतील असें दिसतें.

## कोलंबो योजनेंतहि अमेरिकाच पुढें

कोलंबो योजनेप्रमाणें दक्षिण आशिआ व आग्नेय आशियामधील देशांना आतांपर्यंत १०० कोटी डॉलर्स अथवा ४७५ कोटी रुपयांची मदत देण्यांत आली आहे. तथापि ह्या मदतींतहि अमेरिकेकडून आलेल्या मदतीचा वांटाच सर्वांत अधिक आहे. योजनेप्रमाणें देण्यांत आलेल्या एकूण मदतींपैकीं ८३ कोटी डॉलर्सची मदत अमेरिकेनें दिलेली आहे. उरलेल्या मदतींपैकीं बहुतेक मदत ऑस्ट्रेलिआ, ब्रिटन, कॅनडा, जपान व न्यूझीलंड ह्या देशांकडून आलेली आहे. कोलंबो मदत योजना १९५० सालीं चालू करण्यांत आली. मदत देण्याचे प्रकार बरेच आहेत. परंतु मुख्यतः पुढील कामासाठीं मदत देण्यांत आली. ( १ ) राष्ट्रीय विकासांच्या कामासाठीं कर्जें व देणग्या, ( २ ) मालाचा पुरवठा—ह्यांत अन्नधान्य, खतें, रोजच्या उपयोगाचा इतर प्रकारचा माल ह्यांचा समावेश आहे, ( ३ ) विशेष प्रकारची यंत्रसामग्री व शेतीचीं विविध प्रकारचीं अवजारें, ( ४ ) वाहतुकीचीं साधनें, ( ५ ) ( ५ ) संशोधन संस्थांना लागणारीं उपकरणें, ( ७ ) तंत्रज्ञांचा सल्ला आणि मदत आणि ( ८ ) आधुनिक उत्पादनतंत्राची माहिती करून देण्यासाठीं दक्षिण व आग्नेय आशिआंतील देशांमधील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची सोय. कोलंबो मदत योजना आतां १९६६ पर्यंत अमलांत राहाणार आहे. योजनेचा काल आणखी वाढवावयाचा किंवा काय, हें अद्याप ठरविण्यांत आलेलें नाहीं. १९६४ सालीं योजनेच्या सल्लागार समितीची बैठक भरणार आहे. त्या वेळीं ह्या प्रश्नाचा विचार करण्यांत येणार आहे. ब्रिटन युरोपिअन सामायिक बाजारपेठेंत सामील झाल्यामुळें काय परिणाम झाला हें त्या सुमारास अजमावतां येण्याची शक्यता आहे.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

## क्रेडिट गॅरंटी योजना

### व्यापारी बँकांना वाव का नाहीं ?

भारत सरकारनें क्रेडिट गॅरंटी योजना अंमलांत आणली, त्याला सुमारें दोन वर्षें झालीं. रिझर्व्ह बँकेनें ती योजना स्टेट बँकेच्या सल्ल्यानेंच तयार केली होती. रिझर्व्ह बँकेनें ह्या योजनेचा मार्च, १९६२ अखेरचा २१ महिन्यांचा अहवाल सादर केला आहे, त्यावर सरकारचा विचार चालू आहे. योजनेचा प्रयोग प्रारंभीं दोन वर्षें करण्याचें ठरलें होतें. रिझर्व्ह बँकेच्या अहवालावरून सरकार पुढील धोरण ठरवीपर्यंत योजना चालू राहाणार आहे.

ही योजना २२ जिल्ह्यांतून प्रथम सुरू करण्यांत आली. जानेवारी, १९६१ मध्यें २६ जिल्हे आणि जून, १९६१ मध्यें ५२ जिल्हे योजनेंत समाविष्ट होते. योजनेंतील बँकांची संख्याहि वाढतवाढत आतां ९३ झाली आहे:—स्टेट बँक आणि तिच्या आठ सबसिडिअरी बँका, ४८ इतर शेड्यूल्ड बँका, २१ राज्य सहकारी बँका, १५ राज्य फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन्स. ३१ मार्च, १९६२ अखेर २३४८ गॅरंटी सर्टिफिकिटें देण्यांत आलीं, त्यांपैकी २१९२ स्टेट बँकेला मिळालीं, ३५ तिच्या सबसिडिअरी बँकांना मिळालीं. शेड्यूल्ड बँकांच्या वांट्याला ६० आलीं आणि राज्य सहकारी बँका व फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन्स ह्यांना अनुक्रमें ३७ व २४ मिळालीं. एकूण ७·६३ कोटी रुपयांच्या सर्टिफिकेटांपैकी ७·०१ कोटी रुपयांचीं स्टेट बँकेला, ०·२० कोटी रुपयांचीं तिच्या सबसिडिअरी बँकांना, ०·१७ कोटी रुपयांचीं शेड्यूल्ड बँकांना आणि ०·२५ कोटी रुपयांचीं इतरांना मिळालीं. म्हणजे, ९४% कर्जाच्या गॅरंटीचीं सर्टिफिकिटें एकट्या स्टेट बँकेच्या व तिच्या सबसिडिअरी बँकांच्या वांट्यास आलीं. स्टेट बँक लहान उद्योगांना जीं कर्जें देतें, तीं ह्या गॅरंटी खालीच; तींहि योग्य तरत्या तारणावरच. क्रेडिट गॅरंटीची योजना स्टेट बँकेसाठीच आहे काय ? व्यापारी बँकांना योग्य तो वांटा कां उचलता आला नाहीं, ह्याचा विचार केला गेला पाहिजे.

---

### बँक अवार्ड बँका पूर्णत्वानें अंमलांत आणणार

" नवीन बँक अवार्डमुळें बँकांवर बराच मोठा बोजा पडणार आहे, पण बँकिंगच्या प्रगतीच्या आणि बँकिंग क्षेत्रांतील सलोख्याच्या दृष्टीनें बँका अवार्ड मान्य करून त्याची अंमलबजावणी करतील " असें इंडियन बँक्स असोसिएशनच्या मॅनेजिंग कमिटीनें जाहीर केलें आहे. फेडरेशन ऑफ इंडियन बँक एम्प्लॉईज युनियनचे सेक्रेटरी, श्री. व्ही. कृष्णन्, ह्यांनीं एक पत्रक काढून बँक अवॉर्डमुळें कर्मचाऱ्यांना मिळणारे फायदे खरेखुरे नसून केवळ दिखाऊ आहेत, असें म्हटलें आहे. कारकून आणि कनिष्ठ नोकर ह्यांच्या मूळ पगाराच्या फक्त ८० व ७० टक्के पगारच प्रॉव्हिडंट फंडास पात्र होणार आहे. ग्रॅच्युइटीलाहि तेंच लागू आहे. ट्रायब्यूनलनें कांहीं महत्त्वाचे मुद्दे तर अजिबात डावलले आहेत असेंहि त्यांनीं म्हटलें आहे.

---

### इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सच्या परीक्षा

दि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या कौन्सिलच्या १९६१ अखेरच्या अहवालाप्रमाणें, इन्स्टिटयूटच्या पटावर एकूण २१,१६५ सभासद आहेत. १९६१ सालीं ४१४ केंद्रांत मिळून १६,२०३ उमेदवार इन्स्टिटयूटच्या परीक्षांना बसले. बुक्कीपिंग अँड अकौंटस व हायर अकौन्टन्सी ह्या विषयांत उत्तीर्ण होणाऱ्यांचें प्रमाण सुमारें ६५% पडलें, तर इतर कोणत्याहि विषयांत तें बहुधा ४५% च्या वर आढळत नाहीं.

### पाकिस्तानांत बहुपत्नीकत्वाची बंदी उठवण्याचा प्रयत्न

पाकिस्तानांत कांहीं विशेष परिस्थितीमधील अपवाद सोडून, बहुपत्नीकत्वाला प्रतिबंध करणारा ऑर्डिनन्स काढण्यांत आला होता, तो रद्द करण्यासाठी एक बिल पाकिस्तानी नॅशनल असेंब्लींत मांडण्यांत आलें आहे. तें मांडण्यास सहा स्त्री सभासदांनीं विरोध केला, तरी ६० विरुद्ध ३७ मतांनीं बिलाचें पहिलें वाचन मंजूर झालें. मार्शल लॉ अमदानींत प्रेसिडेंट अयूबखाननें हा ऑर्डिनन्स पास केला होता; इजिप्तमध्यें प्रेसिडेंट नासरनें असाच कायदा जारी केला असून टर्कीमध्यें तर केमालपाशापासूनच ह्या बाबतींत स्त्रिया व पुरुष ह्यांना सारखें लेखलें जात आहे; ह्याचा अर्थ मुस्लिम देशांतील हुकूमशहांच्या कारकीर्दी अधिक प्रगतिप्रिय असल्याचें दिसून येतें. अयूबखानचा ऑर्डिनन्स इस्लामच्या तत्त्वांच्या विरुद्ध असल्याचा बिल मांडणाराचा दावा आहे.

ऑर्डिनन्स रद्द करू पाहाणाऱ्या बिलाला पाकिस्तानांतील स्त्रियांच्या संस्था कसून विरोध करीत आहेत; आणि त्या विरोधाला प्रगतिप्रिय वृत्तपत्रांचा पाठिंबा आहे.

---


### व्ही. शांताराम ग्रामोफोन रेकॉर्ड्सची फॅक्टरी सुरू करणार

सुप्रसिद्ध चित्रपटनिर्माते श्री. व्ही. शांताराम, ह्यांनीं आपल्या राजकमल स्टुडिओजमध्यें ग्रामोफोनच्या रेकॉर्डस तयार करण्याची योजना केली आहे. चित्रपटनिर्माते आणि ग्रामोफोन रेकॉर्डस तयार करणाऱ्या कंपन्या, त्याचप्रमाणें पार्श्वसंगीत देणारे कलावंत आणि निर्माते, ह्यांचेमध्यें रेकॉर्डसच्या रॉयल्टीबद्दल वाद माजून राहिले आहेत. फिल्मी गाण्यांची रेकॉर्डस तयार करणाऱ्या ग्रामोफोन कंपनीनें कांहीं महिन्यांपूर्वी रेकॉर्डस तयार करणें बंद केले होते; कारण निर्मात्यांकडे गायक आणि संगीतदिग्दर्शक जास्त रॉयल्टीची मागणी करीत असल्यामुळें निर्मात्यांनाहि कंपनीकडून अधिक रॉयल्टी हवी होती. चित्रपटनिर्मात्यांच्यासाठी रेकॉर्डस तयार करण्याची योजना शांताराम ह्यांनीं आंखली असून, निर्मात्यांना स्वस्त दरानें रेकॉर्डस तयार करून देण्याचा त्यांचा प्रयत्न राहील. दोन महिन्यांत फॅक्टरीचें काम सुरू होईल, अशी अपेक्षा आहे.

---

### " पीक ऑफ कम्युनिझम् " साठी ब्रिटिश गिर्यारोहक

२४,५९० फूट उंचीचें एक रशियन शिखर चढून जाण्यासाठी सर जॉन हंट ह्यांच्या नेतृत्वाखाली १२ ब्रिटिश गिर्यारोहकांची एक तुकडी विमानानें रशियाला गेली; तिला सहा रशियन विमानक येऊन मिळाले आहेत. शिखराचें नांव ' पीक ऑफ कम्युनिझम् ' असें आहे.


वेडेकर
मसाले, लोणचीं
व पापड
आपल्या जेवणांत
विशेष लज्जत
आणतील.
वापरून पाहा.
मुगभाट, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर, कोट व पाल.

### पूर्व पाकिस्तानांत अन्नधान्याची टंचाई

भारतांतील गरज भागविण्यासाठी गहूं घेऊन येणाऱ्या दोन अमेरिकन बोटी आतां पूर्व पाकिस्तानमधील चितगांव येथें जातील. भारत सरकारनें पाकिस्तान सरकारच्या विनंतीस मान देऊन बोटींतील गहू पाकिस्तानला देण्याचें मान्य केलें आहे. पूर्व पाकिस्तानांत अन्नधान्याची फार टंचाई उत्पन्न झाली आहे. दोन्ही बोटीं मिळून सुमारें २०,००० टन गहूं असून पूर्व पाकिस्तानांतील चणचण कमी करण्यास तो मदत करील.

---

### जागतिक अर्थव्यवस्थेपुढील अरिष्ट

भारताचे ब्रिटनमधील हाय कमिशनर श्री. एम्. सी. छगला ब्रिटनमधील इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सपुढें बोलतांना म्हणाले कीं, अलीकडे अमेरिकेंत आणि जगाच्या इतर कांहीं भागांत द्रव्य-विषयक गंभीर अडचणी उत्पन्न झाल्या होत्या. त्यांचा विचार करतां सर्वच जगावर मोठें आर्थिक अरिष्ट कोसळण्याचा धोका उत्पन्न झाला आहे, असें दिसतें. जगांत आर्थिक स्थैर्य नांदविण्याचा एकच उपाय आहे. उत्पादनानें वाढलेल्या पातळीला अनुसरून संपत्तीच्या वांटणीच्या पद्धती वदलणें, हाच तो उपाय होय. हिंदुस्थानांतील ४० कोटी लोकसंख्येचें जीवनमान अद्याप सुधारावयाचें आहे. ब्रिटिश भांडवलदारांनीं ह्या संधीचा फायदा घेऊन भारतांत भांडवल गुंतविण्यास पुढें यावें. भारत व ब्रिटन ह्यांचे संबंध १९४७ नंतर दुरावतील अशीं भाकितें करण्यांत आलीं होतीं. परंतु तीं चुकीचीं ठरलीं आहेत.

---

### समुद्रमार्गानें कोळशाची वाहतूक करणार

भारत सरकारच्या मालकीच्या शिपिंग कॉर्पोरेशनसाठी आणखी सहा बोटी घेण्याचा विचार चालू आहे. कॉर्पोरेशनच्या मालकीच्या २१ बोटी आहेत. परंतु त्या आंतरराष्ट्रीय समुद्रमार्गावर वाहतूक करीत असतात. नव्या बोटी खरेदी करण्याचा मुख्य उद्देश कोळशाची वाहतूक समुद्रमार्गानें करण्याचा आहे. देशांतील निरनिराळ्या भागांतील कारखान्यांना लागणारा कोळसा सध्यां बहुतेक रेल्वेनें वाहून नेण्यांत येतो. त्यामुळें रेल्वेवर फार ताण पडतो. रेल्वेवरील ताण कमी करण्यासाठी कोळशाच्या वाहतुकीचे अन्य मार्ग उपयोगांत आणण्याचे प्रयत्न करण्यांत येतील, असें सरकारतर्फे लोकसभेंत सांगण्यांत आलें होतें. सध्यां किनाऱ्यालगत वाहतूक करणाऱ्या बोटींतून सुमारें १५ लाख टन कोळसा वाहून नेण्यांत येतो. आणखी ५ लाख टन कोळसा समुद्रमार्गानें हलवावा, असा सरकारचा विचार आहे.

### शिक्षण कराला बागाईत शेतकऱ्यांचा विरोध

महाराष्ट्र सरकारनें आपल्या अंदाजपत्रकांत व्यापारी पिकांवर शिक्षण कर घेण्याचें ठरविलें आहे. नगर तालुक्यांतील श्रीरामपूर, कोपरगांव-राहुरी भागांतील बागाईत शेतकरी ह्या कराला विरोध करीत आहेत. कालव्याच्या पाण्यावर ऊंस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांकडून दर एकरामागें २५ रुपये आणि विहिरीच्या पाण्यावर ऊंस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांकडून दर एकरामागें १५ रुपये शिक्षण कर घेण्यांत येणार आहे. कापसाच्या पिकांवर दर एकरामागें १० रुपये आणि भुइमुगाच्या व इतर गाळित पिकावर दर एकरीं ५ रुपये शिक्षण कर घेण्यांत येणार आहे. पाणीपुरवठ्याचे वाढलेले दर, उसाच्या दर एकरीं पिकांत झालेली घट आणि खतांच्या वाढत्या किंमती लक्षांत घेऊन हा कर घेण्यांत येऊं नये, असें विरोधक म्हणतात.

टेलिफोन नं. २४८३.

## पुणें सेंट्रल
## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,

लक्ष्मी पथ, पुणें शहर.

**इकडे वेळींच लक्ष द्या........**

**आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा सहकारी बँकेंत गुंतवून निश्चिंत राहा.**

**दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून आमचे बँकेनें कायम व सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचे दरांत वाढ केली आहे.**

| कायम ठेव | | व्याजाचे नवीन दर |
|---|---|---|
| १ वर्ष | ... ... | ४ टक्के |
| २ वर्षे | ... ... | ४। टक्के |
| ३ वर्षे | ... ... | ४॥ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव | ... ... | २॥ टक्के |

**या खेरीज शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिट्सवरील व्याजाचे दराबाबत चौकशी करणेसाठी कार्यकारी संचालक यांना बँकेचे वेळेंत समक्ष भेटा. संबंधी सर्व माहिती ते आनंदानें पुरवतील.**

बा. ग. अळतेकर, बी. कॉम., कार्यकारी संचालक.

शि. म. काळे, एम्. एल्. ए. अध्यक्ष.

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

**हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.**

टेलिफोन नं ६४] स्थापना १९३६ [तारेचा पत्ताः—युवरबँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :—०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :—३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष—४ टक्के, २ वर्षे—४·२५ टक्के, ३ वर्षे—४·५० टक्के, ४ वर्षे—४·७५ टक्के, ५ वर्षे—५ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच कंपल्सरी सेव्हिंग्ज व क्युमिलेटिव्ह ठेवीचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा. **शाखा विस्तार**

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर-मार्केट यार्ड, ११. इलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| गंगाजळी | रु. | ४,३०,००० |
| ठेवी | रु. | २,८७,११,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ३,२५,००,००० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., जनरल मॅनेजर.

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. चेअरमन.

### यंत्रचलित नांगरांचें उत्पादन

भारताच्या संरक्षण खात्यातर्फे चालविण्यात येणाऱ्या कासीपूर येथील शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांत लहानमोठे यंत्रचलित नांगरहि तयार करण्यांत येतात. नांगर तयार करण्यासाठी कांहीं सुटे भाग परदेशांतून मागवावे लागतात. परंतु, येत्या दोन वर्षांत अशा भागांची जरुरी फारच कमी प्रमाणांत लागू लागेल. देशांत पाणी-पुरवठ्याच्या मोठमोठ्या योजना हातीं घेऊन पार पाडण्यांत येत आहेत. त्यामुळें यंत्रचलित नांगरांची मागणीहि दिवसेंदिवस वाढत चालली आहे. कासीपूर येथील कारखान्यांत १७ लाख रुपयांचें परदेशीय चलन गुंतविण्यांत आलें आहे. कारखान्यांत झालेल्या उत्पादनामुळें आतांपर्यंत ८० लाख रुपयांच्या परदेशीय चलनांची बचत झाली आहे. १९५९ सालीं एका जपानी कंपनीच्या साह्यानें यंत्रचलित नांगर बनविण्यास प्रारंभ करण्यांत आला. आतांपर्यंत ६७० नांगर तयार करण्यांत आले आहेत. कारखान्यांत दररोज एक नांगर तयार होऊ शकतो. कारखान्यांत तयार होणाऱ्या मालवाहू मोटारीमुळें २७६ लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत झाली आहे.

### कोचीन येथील जहाज कारखान्यासाठी सहकार्य

कोचीन येथें निघणाऱ्या जहाजबांधणीच्या सरकारी मालकीच्या कारखान्यांत भांडवल गुंतविण्याची व तांत्रिक मदत देण्याची तयारी पश्चिम जर्मनींतील एका कंपनीनें दाखविली आहे. ह्या-संबंधी भारत सरकार व जर्मन कंपनी ह्यांच्यांत लवकरच बोलणीं सुरू होण्याचा संभव आहे. जहाज कारखान्याच्या उभारणीसाठी लागणारें परदेशीय चलन वरील जर्मन कंपनीनें देऊं केलें आहे, ही गोष्ट विशेष महत्त्वाची मानली जात आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी सहकार्य देण्याची तयारी एका जपानी कंपनीनें व नॉर्वेजिअन कंपनीनेंहि दाखविली आहे. ह्या कंपन्यांकडून तपशीलवार माहिती मिळविण्याचा प्रयत्नहि चालू आहे. त्यांच्या-कडून जरूर ती माहिती आल्यावर भारत सरकार अखेरचा निर्णय घेईल अशी अपेक्षा आहे.

### सोन्याच्या खाणी सरकार ताब्यांत घेणार

मध्यवर्ती सरकारनें हत्ती येथील सोन्याच्या खाणी आपल्या ताब्यांत घेऊन चालविण्याचें ठरविलें आहे. ह्या खाणी एका खाजगी कंपनीच्या मालकीच्या असून त्यांत म्हैसूर सरकारनें बरेंच भांडवल गुंतविलें आहे. खाणी रायचूर जिल्ह्यांत आहेत. त्यामधून दरसाल सरासरी १४,००० औंस सोनें उत्पादन करण्यांत येतें. गेल्या कांहीं वर्षांत ह्या खाणींतून बाहेर काढण्यांत येणाऱ्या सुवर्णमिश्र मातींत सोन्याचें प्रमाण कमी झाल्याचें आढळून आलें आहे. कोलार येथील सोन्याच्या खाणी आपल्या ताब्यांत घेण्याचा निर्णय मध्यवर्ती सरकारनें ह्यापूर्वींच घेतलेला आहे. सध्यां ह्या खाणी म्हैसूरचें सरकार चालवीत असतें.

### मद्रास राज्यांत विजेसाठी धरण

मद्रास राज्यांतील कन्याकुमारी जिल्ह्यांत एक नवें धरण बांधण्याचा निर्णय मद्रास वीजबोर्डानें घेतला आहे. मद्रास राज्यांतील विजेचा पुरवठा वाढविण्याच्या दृष्टीनें धरणाचा उपयोग होईल. धरणाच्या योजनेप्रमाणें दोन जलाशय करण्यांत येणार आहेत. त्यांपैकी पहिल्या मोठ्या जलाशयाच्या साह्यानें ५०,००० किलोवॅट वीज उत्पन्न होईल व दुसऱ्या जलाशयाच्या साह्यानें २५,००० किलोवॅट वीज उत्पन्न होईल. योजनेसाठी सुमारें ८ कोटी रुपये खर्च येईल.


श्री. वा. काळे यांचीं दोन नवीं पुस्तकें

१ दाणे आणि खडे कि. रु. २=५०

२ कौटुंबिक हितगुज कि. रु. ३=००

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

★ सुवर्ण-महोत्सवी वर्ष ★

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई

(दि विदर्भ सहकारी बँक लिमिटेड सम्मीलित)

| मुख्य कचेरी— | विभागीय कचेरी— |
|---|---|
| ९, बेक हाऊस लेन, | महाल–नागपूर |
| फोर्ट, मुंबई | तारेचा पत्ता— |
| टेलिफोन नं. २५५४७४-७५ | फार्मर बँक |

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (७) सांताक्रुझ

: नागपूर विभागांतर्गत शाखा :

(१) सितावर्डी (२) अमरावती (३) चांदा (४) मलकापूर (५) खामगांव (६) बुलढाणा

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगा-साठी दिला जातो.

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. ३ कोटी, ६० लाख |
| गंगाजळी व फंड | रु. १ कोटी, ४ लाख |
| ठेवी | रु. १९ कोटी, १० लाख |
| खेळतें भांडवल | रु. ५४ कोटी, ८६ लाख |

*महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.*

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

चिं. द. दाते,
कार्यकारी संचालक.

### पश्चिम जर्मनीकडून मदत मिळाली

भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या दुसऱ्या वर्षासाठी ५९·५ कोटी रुपयांचें कर्ज देण्याची तयारी पश्चिम जर्मन सरकारनें दाखविली होती. त्यापैकी ११·९ कोटी रुपये कर्ज देण्याच्या करारावर उभयतां देशांच्या प्रतिनिधींनीं सह्या केल्या आहेत. ह्या कर्जाचा विनियोग औद्योगिक कच्चा माल, यंत्रसामग्री, सुटे भाग, इत्यादींच्या खरेदीसाठी करावयाचा आहे. आर्थिक विकासाचीं जीं कामें पश्चिम जर्मनीच्या सहकार्यानें हातीं घेण्यांत आलीं आहेत, तीं चालू ठेवण्यासाठी कर्जाचा प्रामुख्यानें उपयोग करण्यांत येईल.

### बंगलोर येथें नवें मेडिकल कॉलेज

कॅथॉलिक चर्चतर्फे बंगलोर येथें एक नवीन मेडिकल कॉलेज स्थापन करण्यांत येणार आहे. कॉलेजच्या स्थापनेसाठी १ कोटी रुपये खर्च येणार आहे. संस्थेसाठी लागणाऱ्या जागेची खरेदी ह्यापूर्वीच करण्यांत आली आहे. कॉलेजच्या स्थापनेसंबंधीं बोलतांना मुंबईचे आर्च बिशप कार्डिनल ग्रॅशिअस म्हणाले कीं, कॉलेजसारख्या संस्था राष्ट्रीय एकात्मकता वाढीस लावणाऱ्या असतात; म्हणून त्यांना सरकारी मदत मिळण्याचा हक्कच आहे. मात्र मदत देतांना अटी घालण्यांत येऊं नयेत.

### राष्ट्रीय उत्पन्नांत ३% वाढ

१९६१-६२ मध्यें, म्हणजे तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षी, भारताचें राष्ट्रीय उत्पन्न ३·५% नें वाढलें; १४,२०० कोटी रु. चें तें १४,६९० कोटी रु. झालें. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत राष्ट्रीय उत्पन्नांत २०% भर पडली होती; तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ३०% वाढीची अपेक्षा आहे. म्हणजे, वार्षिक वाढ ६% व्हायला हवी.

### पेटंटसाठी अर्ज

भारतांत १९६१ मध्यें पेटंटसाठी ५२८९ अर्ज आले. १९६० मधील हाच आंकडा ४५०३ होता. यांपैकी ७७४ अर्ज खुद्द भारतांतूनच आले. १९६० चा हा आंकडा ७२१ होता. त्यांतले ५७ टक्क्यांहून अधिक अर्ज महाराष्ट्र आणि प. बंगाल या दोन राज्यांतून आले.

**कोयाली येथील तेल कारखाना**—बडोद्याजवळ कोयाली येथें काढण्यांत येणाऱ्या तेलशुद्धीच्या कारखान्यासाठी लागणारी जमीन गुजरात सरकार लवकरच ताब्यांत घेईल. कारखान्यासाठी एकूण १,३०० एकर जमीन लागणार आहे. त्यांपैकी २०० एकर जमीन प्रथम घेण्यांत येईल. जमिनींसाठी द्यावयाच्या किंमतीचा प्रश्न सुटला आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००
बचतीच्या आकर्षक योजना
( १ ) स्पेशल सेव्हिंग — व्याजाचा दर २॥ टक्के
( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत — " ३। "
( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें — " ५ "
मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.
मॅनेजर—ना. शं. कानिटकर

वाढत्या धंद्याकरितां
मर्यादित
मुदतीच्या ठेवी
घेणें आहेत.
The Travancore Ogale Glass, Mfg. Co. Ltd.
P. O. Udyogamandal,
( KERALA. )

## सहकारी साखरकारखान्यांचे उसाचे भाव ठरवून दिले

महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळकमिटीनें राज्यांतील सहकारी साखर कारखान्यांचे उसाचे भाव पुढीलप्रमाणं निश्चित केले:—

कारखान्याचें नांव, भाव, ठेव व रोख पुढीलप्रमाणें—कोळपेवाडी ५०·२५, १·००, ९·२५, अशोक ५०·००, ३·५०, ६·५०, गणेश ४७·५०, ३·५०, ९·००, राहुरी ५०·००, २·००, ८·००, मालेगांव ५८·००, ३·००, १५,००, छत्रपति ५८·७५, १·००, ९·७५, श्रीराम ५४,००, २·००, १२·००, पंचगंगा ४८·००, ५·००, ८·००, वारणा ४८·४६, भोगावती ४५·७४, ३·७४, ५·००, शेतकरी ४७·००, ५·००, ५·७५, गिरणा ४७·२५, ५·००, २·७५.

याशिवाय सर्वांस खोडकीचा १ रु. जादा मिळणार आहे. कृष्णा सहकारी कारखान्याचे भाव अद्याप ठरलेले नाहींत. प्रवरा सहकारी हा कर्जमुक्त कारखाना असल्यानें त्याचा ५३ रु. अधिक १ रु. खोडकी असा भाव आहे. ४८ ते ५० पर्यंत ३ टक्के, ५१ ते ५३ पर्यंत ४॥ टक्के व ५४ चे वर ६ टक्के डिव्हिडंड देण्याचा निर्णय घेण्यांत आला.

## कोळशाच्या खाणीजवळ मदतकेंद्रें

कोळशाच्या खाणींत अपघात होऊन कामगार दगावतात अगर जखमी होतात. अशा वेळीं संकटांत सांपडलेल्या कामगारांना वेळेवर मदत पोंचविणें महत्त्वाचें असतें. ह्या दृष्टीनें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत मध्यवर्ती सरकारनें २० मदतकेंद्रें उभारण्याचें ठरविलें आहे. हीं केंद्रें कोळसाखाणींच्या निरनिराळ्या विभागांत खोलण्यांत येतील. त्यांच्या उभारणीसाठी सरकारला १·८ कोटी रुपये खर्च येणार आहे.

## ग्रामीण भागांतील घरांसाठी मदत

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत ग्रामीण भागांतील लोकांना घरें बांधण्यास मदत म्हणून मध्यवर्ती सरकारतर्फे ५ कोटी रुपये राज्य सरकारांना देण्यांत येणार आहेत. ग्रामीण भागांतील भूमिहीन शेतकऱ्यांच्या घरासाठी जमीन मिळविण्याच्या कामीं राज्य सरकारांनीं वरील मदतीचा उपयोग करावयाचा आहे. अशा भूमिहीनांच्या घरांसाठी जमीन मिळविणें, ती सुधारणें आणि तिचें वांटप करणें, हीं कामें राज्य सरकारांनीं करावयाचीं आहेत. पांच कोटींची ही रक्कम देणगी म्हणून देण्यांत येणार आहे.

माझा बाप गाडग्यांत पैसे ठेवायचा ...

अडीअडचणीला उपयोगी पडावेत म्हणून माझा बाप गाडग्यांत पैसे ठेवायचा. पण त्यांत चोरीची धास्ती असायची. आतां काळ बदलला. मोटे ऐवजीं इंजिनं आलीं, रापा ऐवजीं मिश्र खतं आलीं. त्याप्रमाणें पैसा सुरक्षित ठेवायला महाराष्ट्र बँकेची सोय झाली. मी तर माझा पैसा अडका महाराष्ट्र बँकेंतच ठेवतों. तेथें पैसा सुरक्षित राहून त्यावर व्याजहि मिळतें व अडीअडचणीला ते काढतां येतात. महाराष्ट्र बँकेत खातं उघडणंहि अगदीं सोपं आहे. तेथील वागणूक किती आपुलकीची असते! मला तर वाटतं प्रत्येकानं महाराष्ट्र बँकेंतच खातं उघडावं.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

मुख्य कचेरी: थोरले बाजीराव रस्ता, पुणें-२

महाराष्ट्र बँकेचे शाखाधिकारी खातें उघडण्यास सर्व प्रकारें मदत करण्यास आनंदानें तयार असतात.



हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.